| | | | |
|---|---|---|---|
| MHNG110007882022 | दाखल तारीख | : | ०२.०९.२०२२ |
| | नोंदणी तारीख | : | ०२.०९.२०२२ |
| | निकाल तारीख | : | २३.०३.२०२६. |
| | कालावधी | : | वर्षे महिने दिवस |
| | | | ०३ ०६ २१ |
| | निशाणी | | ४४ |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग कुही, जिल्हा नागपूर यांच्या न्यायालयात

( पिठासीन अधिकारी पी. के. मुटकुळे )

**नि.फौ.ख.क्र.११०/२०२२**

प्रथम खबर क्र.२८१/२०२२, पोलीस ठाणे, कुही

| | |
|---|---|
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलिस ठाणे अधिकारी,<br>पोलिस ठाणे कुही,<br>ता. कुही, जि.नागपूर. |
| सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती व्ही.ए.फुले |
| आरोपी | १) भाऊराव रामाजी नरुले<br>वय – ४८ वर्षे,<br>२) अतुल भाऊराव नरुले<br>वय – २५ वर्षे दोन्ही आरोपी<br>रा. चाळा, ता. कुही, जि. नागपूर. |
| आरोपींतर्फे विधीज्ञ | श्री. डी. एस. वंजारी |
| घटना तारीख | १९/०७/२०२२ |
| प्रथम खबर तारीख | १९/०७/२०२२ |

| | |
|---|---|
| दोषारोप दाखल तारीख | ०२/०९/२०२२ |
| आरोपींविरुध्द दोषारोप निश्चित तारीख | १७/१०/२०२३ |
| पुरावा चालु तारीख | ०३/०८/२०२४ |
| न्यायनिवाडा राखुन ठेवलेली तारीख | नाही |
| न्यायनिवाडा तारीख | २३/०३/२०२६ |

## आरोपींची सविस्तर माहिती

| अ. क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अतिंम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्या बाबत कलावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | भाऊराव रामाजी नरुले | नाही | ११.११. २०२२ | भादवी कलम ४५२, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ | निर्दोष मुक्त | नाही | नाही |
| २. | अतुल भाऊराव नरुले | नाही | ११.११. २०२२ | | | नाही | नाही |

## अ. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–

| अ.क्र. | नांव | निशाणी | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|---|
| सा. क्र.०१ | देवराव रामाजी नरुले | १२ | तक्रारदार |
| सा. क्र.०२ | अर्जुन झिंगर नरुले | १५ | घटनास्थळ पंच |
| सा. क्र.०३ | शिवकन्या देवराव नरुले | १९ | साक्षीदार |
| सा.क्र.०४ | निधी देवराव नरुले | २० | साक्षीदार |

| | | | |
|---|---|---|---|
| सा.क्र.०५ | विशाल देवराव नरुले | २१ | साक्षीदार |
| सा.क्र.०६ | डॉ.सतिश हरीभाऊ मेश्राम | २५ | वैद्यकीय अधिकारी |
| सा.क्र.०७ | कृष्णा रामाजी घुटके | २९ | तपासी अधिकारी |

**अ. आरोपीतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी—**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**अ– न्यायालयातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी–**

| अ.क्र. | नांव | पुराव्याचा प्रकार<br>(प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, पोलीसांचा साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार,पंच साक्षीदार, इतर) |
|---|---|---|
| नाही | नाही | नाही |

**अभियोगपक्षातर्फे, आरोपीतर्फे व न्यायालयातर्फे निशाणी देण्यात आलेले कागदपत्र**

**अ. अभियोगपक्षातर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नि.क्र.१३ व १४/सा.क्र.०१ | तक्रार व प्रथम खबर |
| २ | नि.क्र.१६ व १७/सा.क्र.०२ | सुचनापत्र व घटनास्थळ पंचनाम्यावरील स्वाक्षरी |
| ३ | नि.क्र.२६, २७ व २८/सा.क्र.०६ | एम.एल.सी. व क्वेरी रिपोर्ट |
| ४ | नि.क्र.३०,३१,३२,३३,३४, ३५, ३६/सा.क्र.०७ | पत्र, सुचनापत्र, घटनास्थळ पंचनामा, अर्ज, जप्तीपत्र, सुचनापत्र, |

**आरोपीतर्फे**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**न्यायालयातर्फे –**

| अ.क्र. | निशाणी क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | नाही | नाही |

**मुद्येमाल –**

| अ.क्र. | आर्टीकल क्रंमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | टॉर्च | आर्टिकल–अ |

# न्यायनिर्णय

(दिनांक २३/०३/२०२६ रोजी घोषीत)

आरोपींविरुध्द प्रस्तुत खटला भारतीय दंड विधान, १८६० कलम ४५२, ३२४, ५०४, ५०६ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात पुढील प्रमाणेः–**

०२. तक्रारदार देवराव रामाजी नरुले याने दिनांक १९.०७.२०२२ रोजी पोलीस ठाणे, कुही येथे तक्रार दिली होती की, त्या दिवशी सायंकाळी ०७.०० वाजताच्या दरम्यान आरोपी भाऊराव हा दारु पिऊन त्यांच्या घरात आला व शेतीच्या खांडी बांधण्याच्या कारणावरुन त्यांना शिवीगाळ करत होता. तक्रारदाराने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. परंतु आरोपी भाऊराव व त्याचा मुलगा त्याला जास्तच शिवीगाळ करत होता. तक्रारदाराचा मुलगा व मुलगी त्यांना समजाविण्यासाठी गेले असता आरोपींनी त्यांना शिवीगाळ करुन

बुक्यांनी व टॉर्चने मारहाण केली. त्यामुळे त्याच्या मुलाच्या पोटाला व डोक्याला मार लागला. तसेच मुलगी निधी हिच्या डोक्याला, डाव्या पायाला व हाताला मार लागुन ते जखमी झाले.

०३. सदर तक्रारीवरुन आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, कुही येथे गुन्हा क्रमांक २८१/२०२२ नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तपासीक अंमलदार यांनी घटनास्थळ पंचनामा केला, एक टॉर्च असा मुद्देमाल जप्त केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींना अटक केली व तपासाअंती आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल केले.

०४. आरोपींविरुध्द निशाणी क्रमांक ०८ वर भारतीय दंड विधान, १८६० कलम ४५२, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवले. सदर दोषारोप आरोपींना समजावुन सांगण्यात आले. आरोपींनी गुन्हा कबुल नसल्याचे नमुद करुन संपरीक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शविली.

०५. आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने एकुण ७ साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

०६. अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. डी.एस.वंजारी यांचा युक्तीवाद ऐकला.

०७. खालील मुद्दे परामर्श करण्याकरीता माझे समक्ष उपस्थित होतात. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालीलप्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपींनी | |

| | | |
|---|---|---|
| | समान उद्देश साध्य करण्याच्या हेतुने तक्रारदार यास मारहाण करण्याच्या उद्येशाने त्याच्या घरात अनाधिकृतपणे प्रवेश केला ? | नाही. |
| २. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याच्या हेतुने तक्रारदार व साक्षीदार यांना बॅटरीने मारहाण करुन इच्छापुर्वक दुखापत केली? | नाही. |
| ३. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याच्या हेतुने तक्रारदार व साक्षीदार यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांचा अपमान केला? | नाही. |
| ४. | अभियोग पक्ष असे सिध्द करतो काय की, आरोपींनी समान उद्देश साध्य करण्याच्या हेतुने तक्रारदार व साक्षीदार यांना फौजदारी पात्र धाकदपटशा केला? | नाही. |
| ५. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दे क्र. ०१ ते ०४ करीता</u> :-

०८. सदर मुद्दे एकसारख्या पुराव्यावर आधारीत असल्यामुळे पुराव्याची पुनरावृती टाळण्याकरीता त्यांचे विवेचन एकत्रीतपणे करण्यात येत आहे. आरोपींवरील दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने विनासंशय असे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपींनी तक्रारदाराच्या घरात

अनाधिकृतपणे प्रवेश करुन तक्रारदार व साक्षीदारांना बॅटरीने मारहाण केली. त्यांच्याकडुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा या उद्देशाने त्यांचा हेतुपूर्वक अपमान केला व त्यांना फौजदारीपात्र धाकदपटशा केला. सदर बाबी सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने नमूद सात साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे.

०९. देवराव सा.क्र.०१ हा प्रस्तुत प्रकरणातील तक्रारदार असुन त्याने त्याच्या साक्षीत असे कथन केले की, घटना दि.१९.०७.२०२२ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता त्याच्या घराच्या हॉलमध्ये घडली होती. त्यावेळी आरोपीने दारु पिऊन शिवीगाळ केली होती. त्यामुळे त्याचा मुलगा विशाल व मुलगी निधी यांनी त्याला समजावले असता आरोपींनी त्यांना बुक्यांनी व टॉर्चने मारहाण केली. त्यामुळे त्याच्या मुलाच्या पोटाला व डोक्याला जबर मार लागला. तसेच मुलीच्या डाव्या पायाला व हाताला मार लागला होता. त्यानंतर त्याने पोलीस ठाण्यात तक्रार नि.क्र.१३ दिली होती. सदर साक्षीदाराच्या उलटतपासातुन असे स्पष्ट होते की, आरोपी व तो भाऊ असुन त्यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद आहे. त्यामुळे त्यांचे आपसात बोलणे चालणे नाही.

१०. शिवकन्या सा.क्र.०३ हिने तिच्या साक्षीत कथन केले की, घटना दिनांक १९.०७ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता त्यांच्या घरी घडली होती. त्यावेळी शेतीच्या कारणावरुन आरोपी क्र.०१ ने त्यांच्या घरी येऊन तोंड वाजवीले होते. त्यांचा मुलगा व मुलीने त्यांना समजावीण्याचा प्रयत्न केला आसता त्याने, त्यांना टॉर्चने मारहाण केली. त्यामुळे मुलाच्या डोक्याला, पोटाला आणि मुलीच्या हाताला व पोटाला लागले होते. उलटतपासामध्ये तिने कबुली दिली की आरापी व त्यांच्यामध्ये शेतीबाबत

वाद असुन घटनेच्या पूर्वीपासुन त्यांचे बोलणे चालणे नाही. भांडण झाले त्यावेळी गावातील १० ते १५ लोक तिथे जमले होते.

११. निधी सा.क्र.०४ हिच्या साक्षीमध्ये असे आले आहे की, घटना दिनांक १९.०७.२०२२ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता त्यांच्या घरी घडली होती. त्यावेळी आरोपी क्र.०१ हा दारु पिऊन त्यांच्या घरी आला होता. तिच्या भावाने त्याला समजाविण्याचा प्रयत्न केला असता त्याने टॉर्चने तिच्या भावाला मारहाण केली. तसेच तिच्या डाव्या हाताला व पायाला टॉर्चने मारहाण केली. तिच्या भावाच्या डोक्याला व पोटाला मार लागला होता. सदर साक्षीदाराच्या उलटतपासातुन सुध्दा असे स्पष्ट होते की आरोपी व त्यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद आहे व घटनेच्या पूर्वीपासुन त्यांच्यामध्ये बोलणे चालणे नाही. तिच्या कथनानुसार घटनेच्या वेळी गावातील लोक जमले होते.

१२. विशाल सा. क्र.०५ याच्या साक्षीत असे आले आहे की घटना दिनांक १९.०७.२०२२ रोजी सायंकाळी ०७.०० वाजता त्यांच्या घरी घडली होती. त्यावेळी आरोपी क्र.०१ ने त्यांच्या सोबत शेतीच्या बांधावरुन वाद केला होता. त्याने समजावीण्याचा प्रयत्न केला असता आरोपीने त्याला व त्याच्या बहिणीला टॉर्चने मारहाण केली होती. त्यामुळे त्याच्या उजव्या हाताला व डोक्याला आणि त्याच्या बहिणीच्या हाताला आणि पोटाला मार लागला होता. सदर साक्षीदाराने सुध्दा उलटतपासात नमुद केले की आरोपी व त्यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद असुन घटनेपूर्वीपासुन त्यांच्या मध्ये बोलणे चालणे नाही.

१३. भारतीय दंड विधान कलम ४५२ अंतर्गत गुन्हा सिध्द

होण्याकरीता घटनास्थळ सिध्द होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु घटनास्थळ पंचनामावरील पंच अर्जुन सा.क्र.०२ हा फितुर झाला आहे. पोलीसांनी त्याच्या समक्ष कोणतीही कारवाई केली नसल्याचे त्याने साक्षीदरम्यान नमुद केले. अभियोगपक्षाने त्याला फितुर घोषीत करुन इतर सुचक प्रश्न विचारले. त्यामध्ये त्याने फिर्यादीच्या घरी लिखापडी केल्याची, फोटो काढल्याची व त्यावर सहया केल्याची बाब मान्य केली आहे. त्यानंतर उलटतपासात त्याने कबुली दिली की त्याने सह्या केल्या होत्या परंतु त्या कशाबाबत केल्या होत्या हे त्याला माहित नाही. तसेच सही केलेल्या कागदाबाबत त्याला काहीही माहित नाही. यावरुन प्रस्तुत साक्षीदारासमक्ष घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला होता ही बाब संशयाविना सिध्द होत नाही. परिणामी कथीत घटनेतील घटनास्थळ सिध्द झाले नाही.

१४. जखमींना झालेल्या जखमा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने डॉ. मेश्राम सा.क्र.०६ यांची साक्ष नोंदवीली आहे. त्याने साक्षीदरम्यान कथन केले की दिनांक १९.०७.२०२२ रोजी त्यांनी विशाल नरुले व निधी नरुले यांची वैद्यकीय तपासणी केली होती. त्यांना विशाल सा.क्र.०५ याच्या कपाळाच्या उजव्या बाजुला एक जखम आढळुन आली होती. निधी सा.क्र.०४ हिच्या उजव्या हाताच्या कोपरावर, डोक्याच्या उजव्या बाजुला, डोक्याच्या डाव्या बाजुला व डाव्या पायावर अशा चार जखमा आढळुन आल्या होत्या. त्या दोघांना झालेल्या जखमा ह्या जड व खडबडीत वस्तुने झालेल्या होत्या. त्यानुसार त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र.२६ व २७ निर्गमीत केले होते. त्याचप्रमाणे त्यांनी गुन्ह्यातील टॉर्चने नमुद जखमा होऊ शकतात असा अहवाल नि.क्र.२८ दिला होता.

१५. विशाल सा.क्र.०५ याच्या कथनानुसार त्याच्या उजव्या हाताला व डोक्याला दुखापत झाली होती. परंतु डॉ. मेश्राम यांच्या कथनानुसार त्यांना त्याच्या कपाळाच्या उजव्या बाजुवर एक जखम आढळुन आली होती. निधी सा.क्र.०४ हिच्या कथनानुसार तिच्या डाव्या हाताला आणि पायाला दुखापत झाली होती. परंतु डॉ. मेश्राम यांच्या कथनानुसार त्यांना तिच्या उजव्या हाताच्या कोपऱ्यावर, डोक्याच्या उजव्या व डाव्या बाजुला व डाव्या पायावर अशा चार जखमा आढळुन आल्या होत्या. सदर बाब वैद्यकीय प्रमाणपत्र नि.क्र.२६ व २७ वरुन स्पष्ट होते. अशाप्रकारे साक्षीदारांचा तोंडी पुरावा व वैद्यकीय पुरावा यांच्या मध्ये महत्वपूर्ण विसंगती आहे.

१६. क्रिष्णा घुटके सा.क्र.०७ यांनी त्यांच्या साक्षीमध्ये कथन केले की, त्यांनी नमुद गुल्ह्याचा तपास केला होता. तपासादरम्यान त्याने पंचासमक्ष घटनास्थळ पंचनामा नि.क्र.३३ केला होता. आरोपींकडुन गुन्ह्यात वापरलेली बॅटरी आर्टिकल–अ जप्त करुन पंचनामा नि.क्र.३५ केला. साक्षीदारांचे जाबाब नोंदवीले. सरतपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले. सदर साक्षीदाराने घटनास्थळ पंचनाामा नि.क्र.३३ व जप्ती पंचनामा नि.क्र.३५ बाबत कथन केले आहे. परंतु घटनास्थळ पंच नि.क्र.३३ वरील पंच फितुर झाला असुन जप्ती पंच नि.क्र.३५ वरील पंचाची साक्ष अभियोगपक्षाने नोंदवीली नाही. त्यामुळे सदर पंचनामे कायदेशीरपणे सिध्द झाले नाही.

१७. तक्रारदार व इतर साक्षीदार यांच्या कथनानुसार घटनेच्या वेळी गावातील लोक जमले होते. अभिलेखाचे अवलोकन केले असता, कोणत्याही स्वतंत्र साक्षीदाराचा जबाब तपासीक अंमलदार यांनी नोंदवीला

नाही. त्यामुळे कोणत्याही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा पुरावा पटलावर आलेला नाही. तक्रारदार व साक्षीदार हे एकाच कुटुंबातील असुन आरोपी व त्यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद आहे. त्यामुळे ते स्वारस्य असलेले साक्षीदार आहेत. विशाल सा.क्र.०५ व निधी सा.क्र.०४ हे कथीत घटनेतील जखमी आहेत. परंतु त्यांची साक्ष व वैद्यकीय पुरावा यामध्ये महत्वपूर्ण विसंगती आहे. त्यामुळे नमुद साक्षीदारांना झालेल्या जखमा ह्या वैद्यकीय पुराव्याशी विसंगत असल्यामुळे सिध्द होत नाही. घटनास्थळ पंच अर्जुन सा.क्र.०२ हा फितुर झाल्यामुळे घटनास्थळ सिध्द झाले नाही. त्याचप्रमाणे जप्ती पंचनामावरील पंच यांची साक्ष नोंदवीली नसल्यामुळे जप्ती पंचनाामा सिध्द झाला नाही. त्यामुळे आरोपीच्या ताब्यातुन टॉर्च आर्टिकल–अ जप्त केले होते ही बाब संशयाविना सिध्द होत नाही. परिणामी गुन्ह्यात वापरलेले शस्त्र सिध्द झाले नाही. आरोपींनी तक्रारदार अथवा साक्षीदार यांना निश्चित कोणत्या शब्दात शिवीगाळ केली अथवा धाकदपटशा केला याबाबत त्यांच्या साक्षीतुन स्पष्ट होत नाही. सबब मी, मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ चे निष्कर्ष नकारार्थी देत आहे.

**मुद्दे क्र.०५ करीता** :–

१८. मुद्दा क्रमांक ०१ ते ०४ च्या निष्कर्षावरुन अभियोग पक्ष आरोपीवरील दोषारोप संशयाच्या पलीकडे जाऊन सिध्द करु शकला नसल्याने आरोपींची निर्दोष मुक्तता करणे न्यायसंगत वाटते. तपासादरम्यान जप्त करण्यात आलेली एक काळ्या पिवळ्या रंगाची बॅटरी मुल्यहिन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करणे उचित ठरेल. सबब मी, मुद्दा क्रमांक ०५ करीता खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आ दे श

१. आरोपी क्र.०१ भाऊराव रामाजी नरुले व आरोपी क्र.०२ अतुल भाऊराव नरुले यांची भारतीय दंड विधान ४५२, ३२४, ५०४, ५०६ सह कलम ३४ या कलमांखालील गुन्ह्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया सहिंता कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपींचे जात मुचलके व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

३. जप्त मुद्देमाल एक बॅटरी मुल्यहीन असल्यामुळे अपिल कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावी.

४. आरोपींनी फौ.प्र.संहीता कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी प्रत्येकी रक्कम रु. ५०,०००/– चा जात मुचलका द्यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत)

PARASRAM KUNDLIK MUTKULE
Digitally signed by PARASRAM KUNDLIK MUTKULE
Date: 2026.03.23 17:07:27 +0530

**(पी. के. मुटकुळे)**

दि. २३.०३.२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,

कुही, जि.नागपूर.

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईलमधील न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – सौ. व्ही. आर. सावरकर
न्यायालयाचे नांव – न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कुही.